पुण्यनगरी दि 14/02/2023

# लूटमार रोखणाऱ्या पोलिसांचा सत्कार

**नांदेड / प्रतिनिधी**

सिडको स्मशानभूमीच्या रस्त्यावर होणारी लूटमार रोखण्यात यश मिळविलेल्या पोलिसांचा सत्कार पोलिस अधीक्षकांनी करुन कौतुक केले.



८ फेब्रुवारी रोजी रात्री १०.२० वाजता सिडको स्मशानभूमी कमानीजवळ आलेला प्रवासी ऑटो बुलेटवर आलेल्या तिघांनी अडविला आणि ऑटोवाल्याला पैशाची मागणी केली. मारहाण करीत ऑटोचे हेडलाईट व काचा फोडल्या. ऑटोचालक शेख मैनोद्दीन शेख राजेसाब व प्रवासी ऑटोतून उतरून जात असताना आरोपींनी शेखला पकडले आणि त्याच्या गळ्यावर चाकूने वार केले. तसेच त्याच्याकडील ७ हजार रुपये काढून घेतले वीटेने मारुन त्याला जखमी केले. ही घटना कळताच वेळीच पोलिस पोहोचल्याने एका आरोपीला पकडता आले. याबद्दल पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून इतवारा शहर वाहतूक शाखेचे दिलीप श्रीमनवार, बालाजी वाघमारे, श्रीनिवास रामोड, शेख मुजीबोद्दीन शेख फयाजोद्दीन सर्व पोलीस मुख्यालय नांदेड या कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपये व प्रमाणपत्र बक्षीस म्हणून दिले आणि कौतुकाची थापही मारली.